पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९१८ /२०२४ दि.१४ /०६/२०२४

**—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—**

ज्याअर्थी, विठ्ठलवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १९/०६/२०२४ रोजीपासून गट आस्थापनेवर **'सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२–२०२३'** प्रक्रिया सुरू होणार आहे. सदर प्रक्रियेचे दरम्यान नान्हेण फाटा ते शनिवार पाटील चौक हा सार्वजनिक रस्ता राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ११, नवी मुंबई या गटामधून जात आहे. त्यामुळे पोलीस भरती मधील उमेदवारांना वाहतुकीचा अडथळा निर्माण होऊ नये याकरीता दि. १८/०६/२०२४ ते दि. ०२/०७/२०२४ रोजीपावेतो गट मुख्यालय मधून होणारी सार्वजनिक वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात यावी. भरती प्रक्रिया दरम्यान सदर परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद —** १) नान्हेण गाव येथून राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ११, नवी मुंबई चे मुख्य गेट ते पश्चिम गेट मार्गे बाळेगाव, शनिवार पाटील चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ११, नवी मुंबई चे मुख्य गेट ते पश्चिम गेट येथे प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर वाहने नान्हेण गाव येथून शिरढोण गाव, बाळेगाव, शनिवार पाटील चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. १८/०६/२०२४ रोजी ००:०० ते दि. ०२/०७/२०२४ रोजी २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—**

**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण**

**विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी**

**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे**

**<u>प्रत</u>** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :— सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

२/— म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावून घ्यावीत.